# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०७ // विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक २०/०२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २०/०२/२०१९ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती मा.श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा.श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | खडके सुनिल वामनराव |
| ढेकळे सदाशिव गणपत | कोल्हे प्रविण रामदास |
| बेंडाळे उज्वला मोहन | कापसे मयुर चंद्रकांत |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील प्रतिभा सुधिर |
| सोनवणे सुरेश माणिक | लढ्ढा नितिन बालमुकूंद |
| पोकळे दिलीप बबनराव | बागवान रियाज अहेमद अब्दूल करीम |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.चंद्रकांत डांगे, उपायुक्त, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

∗ सभेस वंदेमारतमने सुरुवात करण्यात आली.

मा.सभापती :- नगरसचिव यांनी विषयास सुरुवात करावी.

नगरसचिव :- जम्मु-काश्मिर, पुलवाम मध्ये दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या विर जवानांना श्रध्दांजली अर्पण करणेकरिता सर्वांनी उभे रहावे. **(सभागृहाने शहीद विर जवानांना श्रध्दांजली अर्पण केली.)** आजच्या सभेत सन्मा.सदस्य सनकत चेतन गणेश, भंगाळे विष्णू रामदास व बरडें नितिन मनोहर अनुपस्थित आहेत.

नगरसचिव:- विषय क्र १) मा.उपायुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/अर्थ/२६०१/२०१९ दि.१६/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे.

नगरसचिव :- मा.सभापती महोदय यांचे म.आयुक्त हे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतील त्यानंतर त्यांना अंदाजपत्रक सादर करतील अशी मी त्यांना विनंती करतो.

(म.आयुक्त सो यांनी मा.सभापती यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तद्नंतर सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर केले. )

(सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे म.मुख्यलेखाधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तद्नंतर सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर केले.)

म.आयुक्त :- मा.स्थायी समिती सभापती व सन्माननीय सदस्य,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये मी जळगांव शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणुन सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे.

सन २०१८-१९ च्या सुधारीत अर्थसंकल्प तयार करतांना उत्पन्नाचा विचार करुन कोणतीही वाढ न करता उत्पन्न खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०१९-२० चा अर्थ संकल्प रु.२३०.९२ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह सुरुवात आहे. त्यामुळे महानगरपलिकेचा अर्थसंकल्प शिल्लक रु.२३०.९२ कोटी, महापालीका उत्पन्न रु.२८०.२७ कोटी व अनुदाने रु.११४.०५ असा एकुण ६२५.२४ कोटी इतका प्रस्तावित आहे तसेच मनपा निधी रु.६५.४७ कोटी व शासकीय निधी रु.४२६.७४ कोटी मिळुन एकुण अंदाज पत्रक रु.१११७.४६ कोटी इतके प्रस्तावित आहे.

शहर वासियांना किमान नागरीसुविधा उपलब्ध करुन देणे मोठे आव्हान असुन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देवुन ते पूर्ण करावे लागणार आहे. सन २०१८-१९ मध्ये महसुलाच्या वसुलीत वाढ करुन

कमीत कमी दायीत्व पुढील वर्षात हंस्तातरीत केल्याने सन २०१९-२० मध्ये नविन मुलभुत नागरी सुविधांच्या कामांसाठी तरतुद करणे शक्य झालेले आहे.

सन २०१८-१९ चा सुधारीत अर्थ संकल्प तयार करतांना संपुर्ण विभागांचा कामानिहाय आढावा प्रलंबीत दायीत्व याचा सविस्तर विचार करण्यात आलेला असुन त्यानुसार पुढील वर्षात नविन कामांसाठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. शहराच्या सुनियोजीत विकासाबाबत मी कटीबध्द आहे.

सन २०१९-२० चे मुळ अर्थ संकल्पीय अंदाज

(रक्कम कोटीत)

| अ.नं. | उत्पन्नाचा तपशिल | सन २०१९-२० चे मुळ अंदाज |
|---|---|---|
| १ | म.न.पा.उत्पन्न | २८०.२८ |
| २ | अनुदाने | ११४.०५ |
| ३ | मनपा निधी | ६५.४७ |
| ४ | शासकिय निधी | ४२६.७४ |
| ५ | आरंभिची शिल्लक | २३०.९२ |
| | **एकुण** | **१११७.४६** |

| अ.नं. | खर्चाचा तपशिल | सन २०१९-२० चे मुळ अंदाज |
|---|---|---|
| १ | महसुली खर्च | ३५३.९८ |
| २ | भांडवली खर्च | २३.७६ |
| ३ | मनपा निधी खर्च | ६५.४७ |
| ४ | शासकिय निधी खर्च | ४२६.७४ |
| ५ | अखेर शिल्लक | २४७.५१ |
| | **एकुण** | **१११७.४६** |

हुडको, जे.डी.सी.सी.बँक या वित्तीय संस्थेकडुन घेतलेल्या कर्जाबद्दल दरमहा रु. ४ कोटी मात्र अदा करावे लागतात. तसेच गाळेप्रश्न प्रलंबीत असल्याने प्रत्यक्ष उत्पन्नात खर्च भागविणे जिकरीचे झालेले आहे. त्यामुळे नागरीकांना सुख सुविधा देवु शकत नसल्याचे खेदाने नमुद करावेसे वाटते.

उपरोक्त विषयी शासनस्तरावर पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु आहे.

जळगांव शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुर्वगामी धोरणात्मक निर्णय घेवुन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणी माझ्या सहकारी अधिकाऱ्यांना प्रोत्साहीत करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.सभापती स्थायी समिती, मा.सभापती महिला व बालकल्याण समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते, सर्व सन्मा.नगरसेवक व सर्व पक्षांचे लोकप्रतिनीधी यांचे मन:पुर्वक आभार व्यक्त करतो.

जळगांव शहरातील सर्व वृत्तपत्र व वृत्तवाहीन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देवुन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे विषेश आभार व्यक्त करतो.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभाग असलेले महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.चंद्रकांत खोसे, उपायुक्त श्री.लक्ष्मीकांत कहार, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थ संकल्प अहोरात्र तयार केल्याबद्दल लेखाविभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करतो.

या पार्श्वभुमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाव्दारे प्रस्तावीत केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणी धोरणांना मुर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर जळगांव महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतीमान होईल असा मला विश्वास आहे. त्यादृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगुन या

आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज महासभेस शिफारस करण्यासाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता दयावी ही विनंती.

धन्यवाद..... जय हिंद....... जय महाराष्ट्र....

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्रं.८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.आयुक्त महानगरपालिका जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/अर्थ/२६०१/२०१९ दि.१६/०२/२०१९ अन्वये मा.आयुक्त यांनी सन २०१८-२०१९ चे सुधारीत सन २०१९-२०२० चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण व निवेदन स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदर सभा तहकुब करणेस मान्यता प्रदान करण्यास येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह

अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन

राष्ट्रगीतानंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**